जनसंपर्क कक्ष
0 3 MAR 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण आशियातले खरे खेळाडू अमेरिका, चीनच

## डॉ. यशवंतराव थोरातः शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यानमालेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : 'दक्षिण आशियामध्ये आपल्या वर्चस्ववादासाठी भारत आणि पाकिस्तानचा वापर करणारे खरे खेळाडू अमेरिका आणि चीन आहेत, याची जाणीव राखून वेळीच सावध व्हायला हवे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानमालेमध्ये अंतिम पुष्प त्यांनी गुंफले. मानव्यशास्त्र सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार होते.

डॉ. थोरात म्हणाले, 'दक्षिण आशियामध्ये आपण पाच ट्रिलियनची महासत्ता म्हणून आगेकूच करीत असलो आणि या विभागामध्ये आपणच अग्रेसर असल्यासारखे वाटत असले तरी तो निव्वळ आभास आहे. या विभागातील सत्तास्पर्धा ही भारत आणि पाकिस्तानमधली नसून अमेरिका आणि चीन यांच्यामधली आहे. चीनला अमेरिकेपेक्षा बलाढ्य व्हायचे आहे आणि अमेरिकेला त्यांना रोखायचे आहे. या पार्श्वभूमीवर, आपल्या विभागामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठीचा निर्धार आपणच करावयाचा आहे. भारत -पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सामंजस्य प्रस्थापित न झाल्यास असे बाह्यघटक त्याचा फायदा उठवित राहणार आणि त्यातून दहशतवादालाच खतपाणी मिळत राहणार.'

श्रीराम पवार म्हणाले, 'भारताने सर्वसमावेशकवाद, तर पाकिस्तानने पृथकवाद स्वीकारला. इस्लाम आणि धर्ममार्तंडांचा अनुनय करून त्यांना आपल्या पाठीशी उभे करायचे आणि त्यानंतर त्यांच्यावर नियंत्रण मिळवायचे, ही खेळी पाकिस्तानने अंगिकारली खरी, मात्र, ही निती कधीही यशस्वी होत नाही. धर्माशी सांगड घालून चालणारे राजकारण हे अंतिमतः आत्मघाताकडे, विनाशाकडेच घेऊन जाते. धर्मांधतेचा विळखा मात्र सोडविता येत नाही. पराकोटीची धर्मांधता आणि टोकाच्या भेदाभेदातून पाकिस्तानात केवळ दहशतवादी संघटना फोफावल्या. लष्कराने केवळ अंतर्गत राजकारणावर अंकुश राखण्यासाठीच आटापिटा केला. यातून त्यांची वाटचाल दिशाहीन झाली. तरीही, बदलत्या भू-राजकीय आणि भू-अर्थशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून भारत-पाकिस्तान संबंधांचे आकलन करवून घेणे आवश्यक आहे. जागतिक शक्तींच्या तालावर नाचावयाचे की हातात हात घालून स्वतःचा मार्ग चोखाळावयाचा, याचा निर्णय दोन्ही देशांनी सूज्ञपणे घेण्याची गरज आहे.'

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार, डॉ. उषा थोरात, रविंद्र भणगे, सुखदेव उंदरे, जयश्री कांबळे उपस्थित होते. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी आयोजित विशेष व्याख्यानमालेतील अंतिम पुष्प ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी गुंफले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार उपस्थित होते.

### संस्कृती समजून घेण्यात अपयश

डॉ. थोरात म्हणाले, 'केवळ इस्लामिक राष्ट्रवादावर देशाची उभारणी करू नका, असा सल्ला डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी महंमदअली जीना यांना पत्र पाठवून दिला होता. मात्र, त्यांनी ते ऐकले नाही आणि त्याची परिणती पुढे बांगलादेशच्या निर्मितीमध्ये झाली. पश्चिम पंजाबी मुसलमानांमधील वरिष्ठत्वाच्या भावनेने पाकिस्तानला एक होण्यापासून सातत्याने रोखले. वायव्य प्रांताकडील बलुच, पश्तून, सराईकी, अफगाण आदी जमातींना सामावून घेण्यात आणि त्यांची संस्कृती समजून घेण्यातही या पश्चिमी पंजाबींना अपयश आले.'


03 MAR 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. यशवंतराव थोरात : विद्यापीठातील दोनदिवसीय व्याख्यानमालेचा समारोप

# अमेरिका, चीनकडून वर्चस्वासाठी भारत-पाक संबंधाचा वापर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दक्षिण आशियामध्ये आपल्या वर्चस्व वादासाठी भारत आणि पाकिस्तानचा वापर करणारे खरे खेळाडू अमेरिका आणि चीन आहेत, याची जाणीव राखून या देशांनी वेळीच सावध व्हायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी शनिवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावरील विशेष व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. 'स्वातंत्र्योत्तर पाकिस्तानची कहाणी' या विषयाच्या अनुषंगाने फाळणीनंतर स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आलेल्या पाकिस्तानच्या वाटचालीचा वेध डॉ. थोरात यांनी घेतला. ते म्हणाले, दक्षिण आशियामध्ये आपण पाच ट्रिलियनची महासत्ता म्हणून आगेकूच करीत असलो आणि या विभागामध्ये आपणच अग्रेसर असल्यासारखे वाटत असले तरी तो निव्वळ आभास आहे. या विभागातील सत्ता स्पर्धा ही भारत आणि पाकिस्तानमधली नसून अमेरिका आणि चीन यांच्यामधली आहे. सन २००६ मध्ये अमेरिका आणि भारत यांच्यामध्ये सहकार्य करार झाल्यानंतर चीनने पाकिस्तानशी संबंध वाढविले. आपले आंतरराष्ट्रीय राजकारण व अर्थकारणातील स्थान वाढविण्यासाठी या महासत्ता या दोन देशांचा वापर करीत आहेत. चीनला अमेरिकेपेक्षा बलाढ्य व्हायचे आहे आणि अमेरिकेला त्यांना रोखायचे आहे, असा हा चेक्स अँड बॅलन्सेसचा खेळ आहे. या पार्श्वभूमीवर, आपल्या विभागामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठीचा निर्धार आपणच



घ्यावयाचा आहे. या दोन्ही देशांमध्ये सामंजस्य प्रस्थापित न झाल्यास असे बाह्यघटक त्याचा फायदा उठवीत राहणार आणि त्यातून दहशतवादालाच खतपाणी मिळत राहणार, असे त्यांनी सांगितले.

डॉ. थोरात म्हणाले, केवळ इस्लामिक राष्ट्रवादावर देशाची उभारणी करू नका, असा सल्ला डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी महंमद अली जिना यांना पत्र पाठवून दिला होता. मात्र, त्यांनी ते ऐकले नाही आणि त्याची परिणती पुढे बांगलादेशच्या निर्मितीमध्ये झाली. स्वातंत्र्यासंदर्भात बोलावयाचे झाल्यास भारताला ब्रिटिशांपासून ते हवे होते, तर पाकिस्तानला ब्रिटिश आणि हिंदूबहुलांकडूनही स्वातंत्र्य हवे होते. पश्चिम पंजाबी मुसलमानांमधील वरिष्ठत्वाच्या भावनेने पाकिस्तानला एक होण्यापासून सातत्याने रोखले. पाकिस्तानमध्ये केवळ मुस्लीम आणि मुस्लिमेतर हा भेद एका बाजूलाच राहिला आणि मुस्लिमांमध्येच शिया, सुन्नी, अहमदिया असे एक ना अनेक सामाजिक भेद निर्माण करण्यात आले. वायव्य प्रांताकडील बलुच, पश्तून, सराईकी, अफगाण आदी जमातींना सामावून घेण्यात आणि त्यांची संस्कृती समजून घेण्यातही या पश्चिमी पंजाबींना अपयश आले. त्यांच्यावर अत्याचाराचा प्रयत्न अंगलट आला. त्याखेरीज पाकिस्तानला प्रागतिक मार्गावर नेण्याची क्षमता असलेल्या जिना यांचा राष्ट्रनिर्मितीनंतर अवघ्या १३ महिन्यांत मृत्यू झाला. तेव्हापासून पाकिस्तानात नेतृत्वाचा संघर्ष कायम राहिला. वीस पंतप्रधान झाले, पण एकही आपला कार्यकाळ पूर्ण करू शकला नाही. लष्कर आणि शासन यांच्यातील संघर्षामध्ये लष्कराचाच वरचष्मा कायम राहिला. पाकिस्तानला राज्यघटनेची निर्मितीही योग्य प्रकारे करता आली नाही. त्याचेच परिणाम पाकिस्तान आज भोगतो आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी उपस्थिती दर्शविली. त्याचप्रमाणे डॉ. उषा थोरात, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 MAR 2024
तरुण भारत

# अमेरिकेसह चीनकडूनही पाकिस्तानचा वापर

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभागातर्फे व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

दक्षिण आशियामध्ये वर्चस्ववादासाठी भारत आणि पाकिस्तानचा वापर करणारे खरे खेळाडू अमेरिका आणि चीन आहेत, याची जाणीव राखून या देशांनी वेळीच सावध व्हायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार होते. 'स्वातंत्र्योत्तर पाकिस्तानची कहाणी' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

डॉ. थोरात म्हणाले, चीनला अमेरिकेपेक्षा बलाढ्य व्हायचे आहे आणि अमेरिकेला त्यांना रोखायचे आहे. यासाठी ते पाकिस्तानचा वापर करतात. पाकिस्तान देशाची केवळ इस्लामिक राष्ट्रवादावर उभारणी करू नका, असा सल्ला डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी महंमद अली जिना यांना पत्र पाठवून दिला होता. मात्र, त्यांनी ते ऐकले नाही आणि त्याची परिणती पुढे बांगलादेशच्या निर्मितीमध्ये झाली. भारताला ब्रिटीशांकडून तर पाकिस्तानला ब्रिटीश आणि हिंदुबहुलांकडूनही स्वातंत्र्य हवे होते. भारताशी संबंधांच्या बाबतीत पाकिस्तान कधीही फारसा संतुष्ट नव्हता. ब्रिटिशांनी जिना यांना मुस्लीमबहुल प्रांत देण्याचे मान्य केले होते. यातून दोन वेळा पाकिस्तानचा भूगोल बदलून घेतला. पश्चिम पंजाबी मुसलमानांमधील वरिष्ठत्वाच्या भावनेने पाकिस्तानला एक होण्यापासून रोखले. पाकिस्तानमध्ये केवळ मुस्लीम आणि मुस्लीमेतर हा भेद बाजूलाच राहिला आणि मुस्लीमांमध्येच शिया, सुन्नी, अहमदिया असे एक ना अनेक सामाजिक भेद निर्माण करण्यात आले. वायव्य प्रांताकडील बलुच, पश्तून, सराईकी, अफगाण आदी जमातींना सामावून घेण्यात पश्चिमी पंजाबींना अपयश आले. आतापर्यंत वीस पंतप्रधान झाले, पण एकही आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. लष्कर आणि शासन संघर्षामध्ये लष्कराचाच वरचष्मा कायम राहिला. लष्कर हाच पाकिस्तानातील प्रभावी राजकीय खेळाडू आहे. पाकिस्तानला राज्यघटनेची निर्मितीही करता आली नाही. अवघ्या तीन प्रश्नांवर तीन वर्षे चर्चा चालली. त्यातून पाकिस्तान हे इस्लामिक राष्ट्र असेल, पाकिस्तान सार्वभौम असेल आणि पाकिस्तान लोकशाहीवादी असेल, अशी तीन फलिते निघाली. मात्र, म्हणजे नेमके काय, याची उत्तरे देण्यात आली नाहीत.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात. सोबत ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार.**

अध्यक्षस्थानावरून श्रीराम पवार म्हणाले, भारताने सर्वसमावेशकवाद, तर पाकिस्तानने पृथकवाद स्वीकारला. इस्लाम आणि धर्ममार्तंडांचा अनुनय करून त्यांना आपल्या पाठीशी उभे करायचे आणि नियंत्रण मिळवायचे, ही खेळी पाकिस्तानने अंगिकारली खरी, मात्र, हे यशस्वी होत नाही. लष्कराने राजकारणावर अंकुश राखण्यासाठीच आटापिटा केला. यातून त्यांची वाटचाल दिशाहीन झाली. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. उषा थोरात, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 MAR 2024
पुढारी

# अमेरिका, चीन हेच दक्षिण आशियातले खरे खेळाडू : डॉ. थोरात

**कोल्हापूर :** दक्षिण आशियामध्ये वर्चस्ववादासाठी भारत व पाकिस्तानचा वापर करणारे खरे खेळाडू अमेरिका आणि चीन आहेत. याची जाणीव राखून या देशांनी वेळीच सावध व्हायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभागातर्फे 'भारत-पाकिस्तान संबंध' या विषयावर आयोजित दोनदिवसीय विशेष व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार होते. डॉ. थोरात म्हणाले, दक्षिण आशियामध्ये पाच ट्रिलियनची महासत्ता म्हणून आगेकूच करीत असलो आणि या विभागामध्ये आपणच अग्रेसर असल्यासारखे वाटत असले, तरी तो निव्वळ आभास आहे. या विभागातील सत्तास्पर्धा ही भारत आणि पाकिस्तानमधली नसून, अमेरिका आणि चीन यांच्यामधली आहे. पाकिस्तानात वीस पंतप्रधान झाले; पण एकही कार्यकाळ पूर्ण करू शकला नाही. लष्कर आणि शासन यांच्यातील संघर्षामध्ये लष्कराचाच वरचष्मा कायम राहिला. लष्कर हाच पाकिस्तानातील प्रभावी राजकीय खेळाडू आहे. पाकिस्तानला राज्यघटनेची निर्मितीही योग्य प्रकारे करता आली नाही. अवघ्या तीन प्रश्नांवर तीन वर्षे चर्चा चालली. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. उषा थोरात, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे आदी उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

0 3 MAR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फौंड्रीतील वाळूच्या विटा, नॅनो पदार्थांपासून औषधे

## शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप्स सादरीकरणात ७४ संशोधकांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठात विज्ञान दिनानिमित्त नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य केंद्रातर्फे इनोव्हेशन, उद्योजकता आणि स्टार्टअप्स यांचे भित्तीचित्र प्रदर्शन आणि मॉडेल सादरीकरण स्पर्धा झाली. स्पर्धेत ७४ जणांनी सहभाग नोंदविला. फौंड्रीतील टाकाऊ वाळूपासून विटांची निर्मिती व रस्त्याकरिता पुनर्वापर, नॅनो-पदार्थांपासून औषधे, रंग निर्मिती, आदी संशोधन प्रकल्प सादर झाले.

स्पर्धेचे उद्‍घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत झाले. प्रदर्शन व स्पर्धेत ७४ पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसह संशोधक आणि नवउद्योजक सहभागी झाले. शाश्वत विकासाबाबत पर्यावरणीय संकल्पना, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणे, पौष्टिक खाद्यपदार्थ निर्मिती पद्धती, नॅनो-पदार्थांपासून औषधे, रंगनिर्मिती, जैविक खते, ऊर्जानिर्मिती, हायड्रोजन, ऑक्सिजन निर्मितीची उपकरणे आदी प्रकल्प सादर झाले. भाभा अणुसंशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. अपूर्व गुलेरिया, प्रभात सिंग, प्रतिभा पाटणकर, आसावरी जाधव, संतोष सुतार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस.एन. सपली, के. एम. गरडकर, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, अनिल घुले, मुरलीधर भानारकर, ईरान्ना उडचान, हेमराज यादव, अभिजीत गाताडे, चेतन भोसले, क्रांतीवीर मोरे, साजिद मुल्लाणी उपस्थित होते.


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात इनोव्हेशन, स्टार्टअप स्पर्धा व प्रदर्शनाची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सागर डेळेकर आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
पुढारी

# विद्यापीठात हिंदी विभागातर्फे मंगळवारी राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हिंदी साहित्यातील सुप्रसिद्ध व्यंगकार हरिशंकर परसाई यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात हिंदी विभागाच्या वतीने मंगळवारी (दि. ५) एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे.

वि. स. खांडेकर भाषा भवन येथे चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. सुरेश माहेश्वरी (अमळनेर) यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्रमुख पाहुणे म्हणून प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत.

चर्चासत्रात विषयतज्ज्ञ म्हणून डॉ. वृषाली मांद्रेकर (गोवा), डॉ. अरुण गंभीर (उस्मानाबाद), डॉ. सुनील बनसोडे (जयसिंगपूर), डॉ. सातापा सावंत (सांगली) मार्गदर्शन करणार आहेत.

समारोपास कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अर्जुन चव्हाण असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्र. विभाग प्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
लोकमत

# सार्वभौमत्व शिवस्वराज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य : कुलकर्णी

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : लोककल्याण आणि सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता, तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी सोमवारी केले.

विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५० व्या शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे त्या काळच्या सामंतशाहीच्या विपरीत निर्माण झालेले होते. उत्तर प्रदेशापासून ते तामिळनाडू प्रांतापर्यंत संपूर्ण देशाला त्यातून प्रेरणा देण्याचे कार्य या घटनेने केले. हे स्वराज्य मध्ययुगीन राष्ट्रभावनेचा प्रभावी आविष्कार ठरले. छत्रपतींच्या आज्ञापत्रांतून राज्य, स्वराज्य, महाराष्ट्रभूमी अशा शब्दांनी स्वराज्याचे वर्णन दिसून येते. राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकसंख्या, विशिष्ट लोकसमूहांचा भूप्रदेश, शासनसंस्थेचे लोकाभिमुख स्वरूप आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सार्वभौम हक्क यांचा समावेश होतो. ही सार्वभौमिकता हे छत्रपतींच्या स्वराज्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सामोरे येते.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन, डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, डॉ. कपिल राजहंस, डॉ. दत्तात्रय मचाले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
तरुण भारत

# दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांची विज्ञान प्रदर्शनाला भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व युजीसी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलीटीज् यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान प्रदर्शनात दृष्टी दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे विशेष शिक्षकांनी भेट दिली. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात आयोजन करण्यात आले. उपक्रमाची सुरूवात अंध विद्यार्थ्यांना उद्यानामध्ये प्रात्यक्षिक दाखवून करण्यात आली. यावेळी डॉ. प्रतिभा बी. देसाई, सतीश नवले आणि अंध शाळांचे शिक्षक व दृष्टी दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांना स्पर्श ज्ञानात्मक प्रयोग पध्दतीने प्रदर्शनाचा अनुभव घेतला. जीव, भौतिक, वनस्पती शास्त्रावर आधारित वेगवेगळे प्रयोग वेगवेगळया प्रतिकृतीच्या माध्यमातून सादरीकरण केले. दुसऱ्या टप्पात प्रयोगांच्या प्रात्यक्षिकासह खुली चर्चा ब्रेल माध्यमातून केली. कुलगरू आणि प्र-कुलगुरू यांनी प्रदर्शनास भेट दिली. यावेळी दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादरीकरण केले. युवराज मिठारी यांनी आभार मानले. जीया जहागीरदार, प्रज्ञा बहर, अंजली तसेच सागर पंडीत, अक्षता बिराजदार यांनी व्हॉलेंटियरस म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील क्रीडा अधिविभागातर्फे शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव सोमवार (ता. ४) ते गुरुवार (ता. ७) दरम्यान सकाळी सात ते सायंकाळी सात यावेळेत होणार आहे. त्यात विद्यापीठातील विविध अधिविभागातील सुमारे दोन हजार खेळाडूंनी नोंदणी केली आहे. क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, बॅडमिंटन, कबड्डी, बुद्धिबळ, अॅथलेटिक्स, मॅरेथॉन स्पर्धा होणाऱ्या महोत्सवाचे उदघाटन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त खेळाडूंचा सत्कार होणार आहे, अशी माहिती क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
सकाळ




चिखली : येथे ज्ञानविस्तार व्याख्यानमालेत बोलताना डॉ. माणिकराव साळुंखे. सोबत प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील व डॉ. प्रकाश दुकळे

# संशोधन बहुआयामी असावे

## डॉ. माणिकराव साळुंखे : चिखलीत व्याख्यानमाला

सरूड, ता. २ : आज ज्ञान विकले जात आहे. त्यामुळे भारतीय समाजाने ज्ञानाधिष्ठित होणे गरजेचे आहे. चौकस प्रश्नातून विज्ञान उभे राहते. संशोधन आंतरविद्याशाखीय आणि बहुआयामी असावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

चिखली (ता. शिराळा) येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयाने आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार व्याख्यानमालेचे वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते. डॉ. प्रकाश दुकळे यांनी करून स्वागत प्रास्ताविक केले.

डॉ. साळुंखे म्हणाले, 'जागतिक परिषदांमधून तापमानवाढ आणि पर्यावरणाचा ऱ्हासावर चर्चा, ठराव होते. प्रत्यक्षात कृती मात्र होत नाही. वाढते तापमान आणि पर्यावरणाचा ऱ्हासामुळे जग विनाशाकडे चालले आहे. हे थांबविण्यासाठी प्रत्येक घटकाने योगदान द्यावे. नावीन्यपूर्ण कल्पना, सर्जनशीलता असणारेच पुढे जातील.' प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, 'विद्यार्थ्यांना संशोधकीय दृष्टी प्राप्त होण्यासाठी अशा व्याख्यानमाला व्हाव्यात. शिवाजी विद्यापीठाच्या काही व्याख्यानमाला महाविद्यालयाने आयोजित करून विद्यापीठाचा उद्देश सफल केला आहे.' डॉ. मांतेश हिरेमठ यांनी सूत्रसंचालन तर डॉ. गोपीनाथ खानसोळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
पुढारी


# विद्यापीठाकडून पदवी, पदव्युत्तर ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सुमारे ६६२ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित केले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बी. आर्किटेक्चर अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2024
पुण्यनगरी

# ऋतिकाला उत्कृष्ट युवा संसदरत्न पुरस्कार



पट्टणकोडोली : पट्टणकोडोली, ता. हातकणंगले येथील ऋतिका बिरू धनगर हिला उत्कृष्ट युवा संसदरत्न पुरस्कार देण्यात आला. धनगर समाजातील मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली ऋतिका शिवाजी विद्यापीठात एमएस्सी गणित विषयाच्या दुसऱ्या वर्षामध्ये शिक्षण घेत आहे. सदर स्पर्धेसाठी देशातील सहा युनिव्हर्सिटीतील २८३ कॉलेजमधून २५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी अंतिम ५५ विद्यार्थ्यांमधून दिल्ली येथील विद्यार्थी संसदेत शिवाजी विद्यापीठातील महाराष्ट्रातील फक्त ८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठातील या आठ जणांनी महाराष्ट्रासाठी प्रतिनिधित्व केले. सत्ताधारी व विरोधी गट यामध्ये हे कामकाज चालते. ऋतिकाने सत्ताधारी गटामधून शिक्षणमंत्री या पदावर काम केले होते. यावेळी विरोधकांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना तिने सडेतोड उत्तरे दिली. तिच्या याच कार्याची दखल घेऊन तिला हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. खासदार धैर्यशील माने, धनंजय महाडिक, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह आमदार प्रकाश आवडे यांनी पत्राव्दारे ऋतिकाचे कौतुक केले आहे.

जनसंपर्क कक्ष
0 3 MAR 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : खेलो इंडिया स्पर्धेच्या रग्बी प्रकाराचे अजिंक्यपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाच्या मुलींचा संघ. सोबत प्रशिक्षक, मार्गदर्शक.

# शिवाजी विद्यापीठ संघास अजिंक्यपद

## खेलो इंडिया रग्बी स्पर्धा : प्रतिस्पर्धी संघांना एकतर्फी नमवत रचला इतिहास

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

इंदिरा गांधी स्टेडियम गुवाहाटी येथे झालेल्या चौथ्या 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२४'मध्ये शिवाजी विद्यापीठच्या मुलींच्या रग्बी संघाने अजिंक्यपद पटकाविले. महत्त्वाचे म्हणजे कोल्हापूरच्या रणरागिणींनी विरोधी संघाला एकाही गुणाची परतफेड करू न देता नवा इतिहास रचला.

स्पर्धेच्या लीग फेरीत शिवाजी विद्यापीठ संघाने एम. जी. काशी विद्यापीठ काशी, जी. एन. डी. विद्यापीठ अमृतसर, राजस्थान विद्यापीठ राजस्थान, एस. जी. स्पोर्टस् विद्यापीठ गुजरात या संघांना अनुक्रमे ६६ - ००, ४६ - ००, ४५ - ०० व ५८ - ०० अशा गुण फरकाने नमवत उपांत्य फेरीत धडक दिली. उपांत्य स्पर्धेत आर. एस. जिंद विद्यापीठ हरियाणा संघास ४४ - ०० अशा गुण फरकाने धुव्वा उडवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम फेरीत शिवाजी विद्यापीठाने चंदिगढ विद्यापीठ मोहालीचा १५ - ०० असा पराभव करत 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी २०२४'चे विजेतेपदक पटकावले.

विजयी संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड आणि कोल्हापूर रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. अमर सासने यांचे मार्गदर्शन लाभले.


**शिवाजी विद्यापीठाचा अजिंक्य संघ असा**

शुभांगी गावडे (कर्णधार), कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, पूजा कुंभार, शितल शिनगारे, साक्षी कुंभार, स्वाती माळी, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, नेहा पाटील, प्राची पारखे, पूनम पाटील. प्रशिक्षक दीपक पाटील, संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे व अर्जुन पिटुक.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 MAR 2024

पुण्यनगरी

# ‘खेलो इंडिया’ स्पर्धेत अमोल बोगार्डेला सुवर्ण



**कोगे :** नागालँड, कोहिमा येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर झालेल्या चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२३ च्या कुस्ती स्पर्धेमध्ये पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाच्या अमोल बोगार्डे याने ५७ किलो वजन गटामध्ये ग्रीको रोमन प्रकारात सुवर्णपदक पटकावले. त्याला संस्थेचे अध्यक्ष व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश देसाई, सचिव डॉ. विद्या देसाई, प्र. प्राचार्य डॉ. एस. एस. पानारी यांचे मार्गदर्शन लाभले. नुकतेच अमोलने ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत ब्रॉंझ पदक, साऊथ झोन स्पर्धेत सुवर्णपदक, तर धाराशिव स्पर्धेत ५७ किलो वजन गटात महाराष्ट्र केसरी किताब, गोवा येथे झालेल्या नॅशनल गेम्समध्ये रौप्यपदक मिळवले आहे.

03 MAR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेलो इंडिया रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे वर्चस्व

## सेव्हन ए साईड प्रकारात आयोजन : अंतिम सामन्यात चंदीगड विद्यापीठाला मात देत पटकावले अजिंक्यपद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

गुवाहाटी (आसाम) येथे चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सअंतर्गत झालेल्या सेव्हन ए साईड रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने चंदीगड विद्यापीठ संघाला १५–० ट्रायने एकतर्फी पराभूत करत अजिंक्यपदाला गवसणी घातली.

भारतीय खेल प्राधीकरण व असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी यांच्या वतीने खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, शिवाजी विद्यापीठ संघाने स्पर्धेत खेळलेल्या सहाही सामन्यात विरुद्ध संघाला आपल्यावर ट्राय करुन गुण मिळवण्याची संधी न देता नव्या विक्रमाची नोंद केली आहे. दरम्यान, लीग आणि बाद पद्धत अशा स्वरुपात सेव्हन ए साईड रग्बी स्पर्धा खेळवण्यात आली. यामध्ये प्रतिनिधीत्व करताना शिवाजी विद्यापीठ संघाने आपल्या पहिल्या सामन्यात काशी येथील एम. जी. काशी विद्यापीठला ६६–० ट्रायने, दुसऱ्या सामन्यात अमृतसर येथील जी. एन. डी. विद्यापीठाला ४६–० ट्रायने आणि तिसऱ्या सामन्यात राजस्थान विद्यापीठला ४५–० ट्रायने मात देत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या फेरीतही शिवाजी विद्यापीठ संघाने गुजरातमधील एस. जी. स्पोर्टस्‌ला ५८ – ० ट्रायने हरवून उपांत्य फेरी गाठली. या फेरीतही शिवाजी विद्यापीठ संघाने हरियाणाच्या आर. एस. जिंद विद्यापीठावर ४४–० ट्रायने विजय मिळवत अंतिम फेरीत उडी घेतली. अंतिम फेरीतही जोमदार खेळ करत चंदिगड विद्यापीठाला पराभूत करत शिवाजी विद्यापीठ संघाने स्पर्धेच्या जेतेपदाला गवसणी घातली. जेतेपदी विराजमान झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, कोल्हापूर रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. अमर सासने, प्रशिक्षक दीपक पाटील व संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे व अर्जुन पिटुक यांचे मार्गदर्शन लाभत आहे.




**कोल्हापूर : चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सअंतर्गत झालेल्या सेव्हन ए साईड वुमून्स रग्बी स्पर्धेत अजिंक्यपद मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ संघासोबत प्रशिक्षक दीपक पाटील, संघ व्यवस्थापक संग्रामसिंह मोरे व अर्जुन पिटुक.**

**शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडूंची नावे :**
शुभांगी गावडे (कर्णधार), कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील, पूजा कुंभार, शितल शिनगारे, साक्षी कुंभार, स्वाती माळी, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, नेहा पाटील, प्राची पारखे, पुनम पाटील